# आदेश

जा.क्र.पोआ/११(६)/सार्वत्रिक निवडणूक–०१–२०२४

पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई तथा कार्यकारी दंडाधिकारी

ज्याअर्थी, (१) ३१– दक्षिण मुंबई (२) ३०– दक्षिण मध्य मुंबई (३) २९– उत्तर मध्य मुंबई (४) २८– उत्तर पुर्व मुंबई (५) २७– उत्तर पश्चिम मुंबई (६) २६– उत्तर मुंबई मतदार संघात लोकसभा निवडणूकीतील मतदान २० मे २०२४ रोजी वरील मतदार संघातील अनेक मतदान केंद्रावर होणार आहे.

आणि ज्याअर्थी, मोठया संख्येने मतदार मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदान केंद्रांना भेट देण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, मी कायदेशीररित्या काम करणाऱ्या व्यक्तींना अडथळा, त्रास आणि दुखापत होण्याचा धोका टाळण्यासाठी आणि सार्वजनिक शांततेचा भंग होण्यापासून रोखण्याच्या उद्देशाने आदेश देणे आवश्यक आहे असे समजतो;

त्याअर्थी, **मी, अकबर पठाण, पोलीस उप आयुक्त (अभियान), बृहन्मुंबई** तथा कार्यकारी दंडाधिकारी, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (१९७४ चा कायदा २) कलम १४४ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनयम, १९५१ (महा.१९५१ चा XXII कायदा) कलम १० (२) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून आदेश करतो की,

प्रथम, मतदान केंद्रावर मतदान होणार असलेल्या निवडणूकीच्या संदर्भात उमेदवार नसलेली कोणतीही व्यक्ती किंवा अशा उमेदवाराचा मान्यताप्राप्त एजंट किंवा निवडणूकीशी संबंधित अधिकारी किंवा कर्तव्यात गुंतलेला कोणताही सार्वजनिक सेवक नसलेली कोणतीही व्यक्ती अशा मतदान केंद्राच्या परिसरात **२० मे २०२४** रोजी सकाळी ६.०० ते मध्यरात्री १२ च्या दरम्यान, महामार्ग, रस्ता, गल्लीबोळ, किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा **(१) ३१– दक्षिण मुंबई (२) ३०– दक्षिण मध्य मुंबई (३) २९– उत्तर मध्य मुंबई (४) २८– उत्तर पुर्व मुंबई (५) २७– उत्तर पश्चिम मुंबई (६) २६– उत्तर मुंबई,** मतदारसंघातील कोणत्याही मतदान केंद्रापासून **शंभर मीटर त्रिज्येच्या** अंतरात घुटमळणार, फिरणार अथवा गर्दी करणार नाही.

दुसरे म्हणजे, मतदानाच्या उद्देशाने मतदान केंद्राना भेट देणाऱ्या सर्व इच्छुक मतदारांनी मतदान केंद्रासमोर रांगा लावल्या पाहिजेत, एक पुरूषांसाठी आणि दुसरी महिलांसाठी. प्रत्येक इच्छुक मतदाराने त्यांच्या किंवा तिच्यानुसार मतदान केंद्रामध्ये अनुक्रमे प्रवेश करावा. मतदारांनी मतदान केंद्रात प्रवेश केल्यानंतर पिठासीन अधिकाऱ्याच्या निर्देशांचे पालन करावे. तसेच, आयोगाने नियुक्त केलेले निरीक्षक आणि अधिकृत निवडणुक अधिकारी/ पोलीस अधिकारी यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीला मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात ''मतदान केंद्राचा परिसर'' (कलम १३० लोकप्रतिनिधी कायदा १९५१) आणि मतदान केंद्राच्या आत मोबाईल फोन/वायरलेस संच बाळगण्याची किंवा वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्याचप्रमाणे, कोणत्याही व्यक्तीने मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात निवडणूक प्रचाराशी संबंधित कोणतेही पोस्टर्स किंवा बॅनर्स लावू नये व लाउडस्पीकर, मेगाफोन इ. चा वापर करू नये.

मी असे निर्देश देतो की, हा आदेश अधिकृत राजपत्रात प्रकाशित केला जाईल आणि बृहन्मुंबईमध्ये त्याच्या प्रती सुस्पष्ट सार्वजनिक ठिकाणी चिकटवून आणि बृहन्मुंबईमध्ये लाऊडस्पीकर किंवा मेगाफोनद्वारे त्याची घोषणा करून प्रसिध्द करण्यात येईल.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक १५ मे २०२४ रोजी दिला आहे

Deputy Commissioner of Police (Operations)

(अकबर पठाण)
पोलीस उप आयुक्त, (अभियान),
तथा कार्यकारी दंडाधिकारी
बृहन्मुंबई

पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई यांचे कार्यालय
दिनांक १५ / ०५ /२०२४

Scanned with CamScanner

# ORDER

**O.W.No. CP/XI(6) General Election-01-2024**

BY THE DEPUTY COMMISSIONER OF POLICE (OPERATIONS) BRIHANMUMBAI AND EXECUTIVE MAGISTRATE

WHEREAS, polling in parliamentary election of (1) 31- South Mumbai (2) 30- South Central Mumbai (3) 29- North Central Mumbai (4) 28- North East Mumbai (5) 27- North West Mumbai (6) 26- North Mumbai Constituencies is to take place at a number of Polling Stations in above constituencies on the **20th May 2024.**

AND WHEREAS, a large number of voters are likely to visit various Polling Stations to exercise their right of voting;

AND WHEREAS, I consider it necessary for the purpose of preventing obstruction, annoyance and injury or risk of obstructing, annoyance and injury to persons lawfully employed and for the purpose of preventing the disturbance of the public tranquaility, to so direct;

NOW THEREFORE, I **Akbar Pathan, Dy. Commissioner of Police (Operations), BRIHANMUMBAI and Executive Magistrate** specially empowered under section 144 of the Code of Criminal Prodecure (Act 2 of 1974) r/w sub-section (2) of section 10 of the Maharashtra Police Act, 1951 (Mah.Act XXII of 1951) do hereby in exercise of the above said powers order;

FIRST, that no person not being a candidate in connection with the election for which polling is to take place at a Polling Stations or the accredited agent of such a candidate or an official engaged in connection with the election or any public servant engaged in duty at or in the vicinity of such Polling Stations shall between 6.00 a.m. and 12 midnight on the **20th May, 2024**, loiter or join or form any assembly or group of persons of any public through fare, highway road, street lane, bye – lane or any other public place within a distance of **one hundred meters radius from any Polling Stations** in **(1) 31- South Mumbai (2) 30- South Central Mumbai (3) 29- North Central Mumbai (4) 28- North East Mumbai (5) 27- North West Mumbai (6) 26- North Mumbai**, constituencies.

SECONDLY, that all intending voters visiting a Polling Stations for the purpose of voting shall form queues in front of the Polling Stations, one for males and another for females, and that each intending voter shall enter the Polling Stations serially in accordance with his or her position in the queue as and when voters are admitted to the Polling Stations in compliance with the directions of the Presiding Officer. No person other than observers appointed by the commission and authorized election/ police officials shall be allowed to either carry or use mobile phones, wireless sets, etc. in the 100 mtrs perimeter of the Polling Stations described as the "Polling Stations neighbourhood" (Section 130 Representation of Pepople Act 1951) and within the Polling Stations. And also, no person shall put election campaign related posters or banners within 100 meters of the Polling Stations. No person shall use loudspeakers, mega phones etc. within 100 meters of the Polling Stations.

I direct that this Order shall be published in the official gazette and promulgated in **BRIHANMUMBAI** by affixing copies thereof in conspicuous public places and by proclaiming the same through loudspeakers or megaphones in **BRIHANMUMBAI.**

Given under my hand & seal this 15th May, 2024.

15/05/24

**(Akbar Pathan)**
Dy. Commissioner of Police (Operations),
Brihan Mumbai and Executive Magistrate.

Office of the
Commissioner of Police,
Brihan Mumbai.
Date :- 15 / 05/2024

Scanned with CamScanner